# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक ०७ जुलै, २०२५ / आषाढ १६, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३९**

---

### मौजे लासूर व गुरुधानोरा (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील शाळा व आरोग्य केंद्र बांधकामात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) * २३६० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लासूर (ता.गंगापुर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शाळा बांधकाम करण्यास रुपये १३२.०० लक्ष व मौजे गुरुधानोरा येथील प्राथामिक आरोग्य केंद्र बांधकामास रुपये ६०.०० लक्ष एवढ्या रकमेस मान्यता दिली असून शाळा बांधकामापोटी रुपये ११२.०० लक्ष तर प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकामासाठी रुपये ३५.०० लक्ष अशी ७५ टक्के रक्कम ठेकेदारास माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास अदा करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही ठिकाणची कामे फक्त ३० टक्के झाली असतानाही व ठेकेदाराची बिले अदा करणेसाठी आवश्यक असलेल्या जिओटॅगशिवाय जिल्हा परिषदेचे अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमताने दोन्ही ठिकाणातील कामे अपूर्ण असतानाही सदर कामांच्या देयकाची ७५ टक्के रक्कम अदा करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) चौकशी करण्यात आली आहे. प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा अधिकचे मुल्यांकन मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेली आहेत. कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट नसतानाही देयके मंजूर करण्यात आलेली आहेत. झालेल्या कामापेक्षा अधिक रकमेची देयके अदा करण्यात आलेली आहेत. संबंधित शाखा अभियंता व प्रभारी उपअभियंता यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे, कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे व त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात येत आहे. तसेच देयके मंजूर प्रक्रियेत जबाबदार जिल्हा परिषद बांधकाम विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून खुलासा प्राप्त झाल्यानंतर उचित कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत विकासकामांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(२) * ३०५९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे सन २०२०-२१, २०२१-२२,२०२२-२३ या आर्थिक वर्षातील १५ वा वित्त आयोग व दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत करण्यात आलेल्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाला असून याप्रकरणी गठीत केलेल्या समितीने ग्रामविकास अधिकारी यांचेविरुध्द प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी असा दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे घाणखेड (ता.बोदवड, जि.जळगाव) येथेही १५ वा वित्त आयोग व दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याने यासंदर्भात नेमलेल्या चौकशी समितीने दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी दिलेल्या अहवालात रुपये ७,६५,५५५/- एवढ्या रकमेच्या झालेल्या गैरव्यवहाराची रक्कम वसूल करून संबंधितावर प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीच्या अहवालानुसार शासनाकडून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) श्री.विजय अशोक भिवसने तत्का. ग्रामसेवक वढोदा ता मुक्ताईनगर यांच्याविरुध्द जिल्हा परिषद, जळगाव या कार्यालयाचे ज्ञापन पत्र जा.क्र.ग्राप/आस्था-१/आरआर/२२९/२०२५ दिनांक ३-६-२०२५ अन्वये प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच श्री.विजय विष्णू सातव, सद्य:स्थितीतील ग्रामविकास अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरुध्द प्रशासकीय व शिस्तभंग विषयक कारवाई करणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (जि.अमरावती) येथील विविध विभागातील यंत्रसामुग्री खरेदी प्रस्तावास मान्यता देऊन अतिविशिष्ट सेवा देणाऱ्या तज्ज्ञांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(३) * ३३९५ श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे टप्पा-३ अंतर्गत Castro Entrology, Implant Surgery (Knee implant, Hip implant, Conchelear Implant) विभाग (युनिट) सुरु करण्याकरीता १०० खाटांच्या इमारत बांधकामासाठी तसेच त्याकरीता लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती यांचेकडून शासनास दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पाठविण्यात आला असून त्यासंदर्भात मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांसह बैठक घेऊन कार्यवाही करण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचित करण्याकरीता मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य तसेच आयुक्त तथा अभियान संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय व आरोग्य संचालक, मुंबई यांनाही दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात मानधन तत्वावर अतिविशिष्ट सेवा तज्ज्ञांना दिनांक १८ सप्टेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार मानधन देण्यात येत असून त्यामध्ये सुप्रा मेजर सर्जरी, मेजर सर्जरी, मायनर सर्जरी इत्यादींचा समावेश असून निर्धारित मानधनात वाढ करण्याबाबत मानधन तत्वावरील अतिविशिष्ट तज्ञांनी दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये अवर सचिव, सार्व. आरोग्य सेवा, मंत्रालय, आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई, सह संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, अर्थ व प्रशासन, मुंबई यांचेकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागाचे सह संचालक, आयुक्तालय, मुंबई यांनी दिनांक २१ एप्रिल, २०२४ रोजी आयोजित केलेल्या VC बैठकीमध्ये अमरावती आरोग्य संदर्भ सेवा रुग्णालयास कर्करोग शस्त्रक्रिया, रेडिएशन ऑन्कोलॉजी युनिट व डे केअर केमोथेरपी रुग्णांचे उपचाराकरीता PET CT Machine इ. बाबतचा मागणी प्रस्ताव पाठविण्याबाबत आदेश देऊन जवळपास १ वर्ष इतका कालावधी होऊनही अद्याप Cardiac Cathlab Machine with Neuro Angiogram, 3D Rational angiography Turnkey यंत्रणेचा पुरवठा करण्यात आला नसल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (जि.अमरावती) येथील विविध विभागातील यंत्रसामुग्री खरेदी प्रस्तावास मान्यता देऊन अतिविशिष्ट सेवा देणाऱ्या तज्ज्ञांच्या मानधनात वाढ करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती या दोन्ही रुग्णालयांकरीता यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीसाठी दिनांक २०/०६/२०२४ च्या शासन निर्णयान्वये रुपये २९,४०,३५,०००/- एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण यांच्या स्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कॅन्सर, कार्डियोलॉजी व युरोलॉजी करीता वैद्यकीय उपकरणे व साधनसामुग्रीसाठीच्या खरेदीसाठी शासन निर्णय दिनांक १२/०६/२०२५ नुसार रुपये १३९,६०,२०,९१०/- एवढया रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) अतिविशिष्ट सेवा देणाऱ्या अतिविशेषतज्ञ यांचे मानधनवाढ याबाबत आयुक्त आरोग्य सेवा यांच्या स्तरावर छाननी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गतच्या कामांमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४) * २६७६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.अनिल परब, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलजीवन मिशन योजनेकरिता १५ हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च करुनही एकूण मंजूर ५०,५६८ कामांपैकी केवळ २३,६९९ कामे पूर्ण झाली असून, २६,८६९ कामे अपूर्ण असल्याची व ४७० योजनांची कामे अजून सुरु झालेली नसल्याची तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत ९४५ योजनांपैकी केवळ ९४ योजना पूर्ण झालेल्या असून इतर सर्व योजना अपूर्ण असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही ठिकाणी सदर योजना पूर्ण होऊनही ग्रामीण भागातील महिलांना व ग्रामस्थांना पाण्यासाठी एक-दोन कि.मी पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलजीवन मिशन योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला असून पात्र नसलेल्या कंत्राटदारांना कंत्राटे, पाईप खरेदी, इतर अनावश्यक कामे देण्यात आल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची व करण्यात आलेल्या कामांची चौकशी करुन त्याअंतर्गत दोषी असणाऱ्या संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली तसेच योजनांची कामे पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत एकूण ५१,५५८ योजना मंजूर असून एकूण २५,५४९ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत अनेक योजनेमध्ये वेगवेगळे तांत्रिक बदल होत असल्याने उर्वरित २६००९ योजना प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत ९४५ योजनांपैकी एकूण १०२ योजना पूर्ण झालेल्या असून; उर्वरित ८४३ योजना प्रगतीपथावर आहेत. जल जीवन मिशन मधील कामांची गती ही जागेची उपलब्धता, स्थानिकांचा विरोध, विविध विभागांच्या परवानग्या, कंत्राटदारांकडून होणारी दिरंगाई, उद्भवातील वर्तविलेला अंदाज चुकणे (Source Fail) व अपुरा निधी या कारणांमुळे मंदावलेली आहे. तसेच माहे ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्रशासनाकडून निधी उपलब्ध झालेला नसून, जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून राज्य शासनातर्फे विशेष बाब म्हणून रुपये २४८३.५८ कोटी रूपये इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. निधी उपलब्ध करून घेण्यासाठी केंद्रशासनाच्या जलशक्ती मंत्रालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही, जेथे योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत, तेथे योजनांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(३) अंशत: खरे आहे. जलजीवन मिशन योजनेच्या कामांबाबत काही तक्रारीं प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावरून अहवाल मागविण्यात आलेला आहे. पात्र नसलेल्या कंत्राटदारांना पाईप खरेदी, कंत्राटे देण्यात आलेले नसून प्रचलित निविदा प्रक्रीयेनूसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांच्या बाबतीत ठेकेदारांकडून कामात दिरंगाई झाल्यास निविदाशर्तीनुसार प्रथमत: दंडात्मक कारवाई केली जाते व तरीही सुधारणा न झाल्यास ठेकेदारास काळया यादीत टाकले जाते. योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. अंदाजपत्रकांची तांत्रिक छाननी केल्यानतंर जरुरी भासल्यास कर्मचारी/अधिकाऱ्यांवर आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

माहे ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्रशासनाकडून निधी उपलब्ध झालेला नसून, जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून राज्य शासनातर्फे विशेष बाब म्हणून रुपये २४८३.५८ कोटी रूपये इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. निधीच्या उपलब्धतेनूसार कामे पूर्ण करण्यात येत आहेत. तथापि, निधी उपलब्ध करणेसाठी केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयास दिनांक ७/१०/२०२५, दिनांक ५/०५/२०२५ व दिनांक १४/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्री महोदयांची समक्ष दिनांक १५/०५/२०२५ रोजी भेट घेऊन केंद्र हिस्सा निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील बालमृत्यूचे उद्दिष्ट शून्यापर्यंत आणण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५) * २९८५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.धीरज लिंगाडे, श्री.संजय केणेकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत असून माहे एप्रिल, २०२४ ते माहे फेब्रुवारी, २०२५ अखेरपर्यंत राज्यात १२,४३८ बालमृत्यू झाले असून एकटया कोल्हापूर जिल्ह्यात चार वर्षात महानगरपालिका स्तरावर १३४४, जिल्हा आरोग्य अधिकारी स्तरावर ३१८ जिल्हा शल्यचिकित्सक स्तरावर ७४ बालकांसह एकूण १७३६ बालकांच्या मृत्यूंची नोंद झाली असून नवजात बालमृत्यूची संख्या प्रति हजार जन्मामागे ११ असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येय धोरणानुसार २०३० पर्यंत नवजात मृत्यूदर कमी करण्याचे उद्दिष्ट असून हे उद्दिष्ट शून्यापर्यंत आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येय धोरणानुसार २०३० पर्यंत नवजात मृत्यूदर १२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून SRS -२०२१ च्या अहवालानुसार राज्याचा नवजात मृत्यूदर ११ आहे. यानुसार राज्यामध्ये २०३० चे सदर उद्दिष्ट विहीत केलेल्या कालावधी पूर्वीच साध्य करण्यात आले आहे.

नवजात मृत्यूदर कमी करण्यासाठी शासनामार्फत विशेष नवजात शिशु काळजी कक्ष - Special New Born Care Unit (SNCU), नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष - (New Born Stabilization Unit (NBSU), नवजात शिशु कोपरा (NBCC), कॉम्प्रिहेन्सिव्ह लॅक्टेशन मॅनेजमेंट सेंटर (सीएलएमसी), बालमृत्यू अन्वेषण, घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC), Social Awareness and Action to Neutralize Pneumonia Successfully (SAANS)- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, ”मा” Mother Absolute Affection (MAA), स्टॉप डायरिया कॅम्पेन (Stop Diarrhoea Campaign), ॲनिमिया मुक्त भारत, नियमित लसीकरण, जननी सुरक्षा, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, मातृत्व अनुदान, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, सुरक्षित मातृत्व आश्वासन इत्यादी उपाययोजना करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खरेदी केलेल्या शववाहिका विनावापर पडून असल्याबाबत

**(६) * २६६६ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने १०० शववाहिका खरेदी केल्या असून त्यासाठी जवळपास ३५ कोटी रुपये खर्च करण्यात आले, मात्र या नवीन शववाहिकांचे वाटप करावयाच्या आदेशासंदर्भातील निर्णय शासनाने जारी केला नसल्याने या नवीन शववाहिकांचे अद्याप वितरण करण्यात आले नसल्याने या सर्व शववाहिका पुणे येथील आरोग्य विभागाच्या कार्यालयात विनावापर पडून असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शववाहिका तातडीने राज्यातील रुग्णालयांना वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. प्रशामा-२०२३/प्र.क. १७१/आरोग्य-४, दिनांक १२ मार्च २०२५ अन्वये शववाहिका वितरणाबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

सदर आदेशानुसार उपसंचालक (परिवहन) आरोग्य सेवा, पुणे या कार्यालयामार्फत ११९ नग शववाहिकांचे हस्तांतर करण्यात आलेले असून उर्वरित १३ नग शववाहिका हस्तांतराचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साखरवाडी (ता.फलटण, जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(७) * २९९० श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरवाडी (ता.फलटण,जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी आलेल्या ४० महिलांकडून वैद्यकीय अधिकाऱ्यांनी १ ते ३ हजार रुपये घेतल्याचे दिनांक ११ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांचा रुग्णालयात मनमानी कारभार सुरु असून येथील कर्मचारी वर्गदेखील हतबल झाले असून तालुक्यात एकमेव शस्त्रक्रिया करणारे अधिकारी असल्याने त्याचा फायदा घेऊन या अधिकाऱ्यांकडून लाच मागितली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) दिनांक १२/०५/२०२५ रोजीच्या दैनिक पुढारी या वृत्तपत्रात सदर वृत्त प्रसिध्द झाले आहे.संबंधित महिलेच्या तक्रारीच्या अनुषंगाने, शस्त्रक्रिया तज्ञांकडे खुलासा मागितला असता त्यांनी संबधीत लाभार्थीकडे कोणतीही आर्थिक मागणी केली नसल्याचा लेखी खुलासा चौकशी समितीस सादर केला आहे. शस्त्रक्रियेसाठी आलेल्या १ लाभार्थी वगळता इतर ३७ लाभार्थींनी कोणतीही आर्थिक मागणी केली नसल्याचे लेखी दिले आहे.

(३) तालुका व जिल्हास्तरावरील चौकशी समितीमार्फत करण्यात आलेल्या चौकशी अहवालाचे अवलोकन करता, संबंधित तक्रारदार यांचेकडे वैद्यकीय अधिकारी यांनी पैसे घेतलेबाबत सबळ पुरावा आढळून येत नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महामार्गावरील शासकीय रुग्णांलयांमध्ये ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबत

**(८) * २४८७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय महामार्गावरील अपघातातील मृत्यू टाळण्यासाठी केंद्र शासनाने अकराव्या पंचवार्षिक योजनेपासून राज्यात राष्ट्रीय महामार्गावरील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये ट्रॉमा केअर सेंटर्सच्या विकासासाठी महत्वाच्या योजना लागू केल्या असून या योजनेतंर्गत शासनाने १०९ ट्रॉमा केअर सेंटर्ससाठी मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर ट्रॉमा केअर सेंटरपैकी केवळ ७३ ट्रॉमा केअर सेंटर्स उभारण्यात आल्याची माहिती कॅगने सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवा व्यवस्थापनाच्या केलेल्या लेखापरीक्षण अहवालातून समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ट्रॉमा केअर सेंटरपैकी ३६ सेंटर्स अद्याप न उभारण्याची कारणे काय आहेत, तसेच उर्वरित ट्रॉमा केअर सेंटर तातडीने उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यात एकूण ११७ ट्रॉमा केअर युनिट मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ७८ ट्रॉमा केअर युनिट सेंटर कार्यान्वित करण्यात आले असून, उर्वरित ३९ ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर ट्रॉमा केअर सेंटरची स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | ट्रॉमा केअर सेंटरची स्थिती |
|---|---|
| १ | बांधकाम पूर्ण ०८ |
| २ | बांधकाम सुरु ०६ |
| एकूण | १४ |

उर्वरित २५ आरोग्य संस्थांबाबत नमूद करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतला आहे की, आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत. तथापि, चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यक त्या ठिकाणी नवीन बांधकामे करण्यात येतील. दरम्यानच्या कालावधीत ज्या ठिकाणी नवीन आरोग्य संस्थांची निर्मिती करणे आवश्यक आहे त्यासंबंधातील माहिती घेऊन आराखडा तयार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार व नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेंतर्गत यंत्रसामुग्री व इंधनावरील खर्चाच्या अनुदानात वाढ करणेबाबत

**(९) * ३४६६ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना राबविण्यात येत असून सदर शासन निर्णयामध्ये अनुक्रमांक ७ अंतर्गत निधीचे स्त्रोतामध्ये नमूद केल्याप्रमाणे यंत्रसाम्रुगी व इंधनावरील खर्चाकारिता (JCB) रुपये ३१ प्रति घनमीटर व गाळ वाहून नेण्यासाठी शेतकऱ्यांना एकरी रुपये १५०००/- च्या मर्यादेत प्रति घनमीटर रुपये ३५.७५ प्रमाणे अनुदान शासन स्तरावरून देय असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही अशासकीय संस्थानी सदर यंत्रसाम्रुगी व इंधनावरील खर्च (JCB) करीता रुपये ३१ प्रति घ.मी खूपच कमी असल्याने कामे करणे शक्य नसल्याचे तसेच प्रति घनमीटर ३५.७५ प्रमाणे गाळ वाहुन नेणे शक्य नसल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यंत्रसाम्रुगी व इंधनावरील खर्चकरीता रुपये ३१ प्रति घ.मी ऐवजी रुपये ५१ प्रति घ.मी व गाळ वाहुन नेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति घनमीटर रुपये ३५.७५ प्रमाणे ऐवजी रुपये ५५/-प्रति घनमीटर अनुदान देण्याची मागणी सदर संस्थामार्फत होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना ही अल्पभूधारक शेतकऱ्यांना लागू असून ती सर्वच प्रकारच्या शेतकऱ्यांना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
जिल्हा स्तरावर रुपये ३१ प्रति घ.मी.दराबाबत ०१ निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
सौहार्द सेवा संस्था,भंडारा या संस्थेकडुन जिल्हा जलसंधारण अधिकारी,भंडारा यांना ०१ निवेदन प्राप्त झाले असून यंत्रसामुग्री व इंधनावरील खर्च रुपये ३१ प्रति घ.मी. ऐवजी रुपये ५५ प्रति घ.मी. मिळावे, अशी मागणी केली आहे.
(४) गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेचा गाळ काढण्यासाठीचा दर हा सद्य:स्थितीत Common Schedule Rate (CSR), WCD २०२२-२०२३ नुसार निश्चित करण्यात आला आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत विधवा, अपंग, आत्महत्याग्रस्त, अत्यल्प आणि अल्पभूधारक या शेतकऱ्यांना अनुदान अनुज्ञेय आहे. सदर अनुदान सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांना लागू करण्याची बाब शासन स्तरावर प्रस्तावित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जळगाव (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील ग्रामपंचायतीमध्ये निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(१०) * ३०७० श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जळगाव (ता.आर्वी, जि.वर्धा) ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये रुपये ५८ लाख ७१८ इतका निधी साहित्य खरेदीवर खर्च करण्यात आला असून सदरची खरेदी निविदा न काढताच केली असल्याप्रकरणी गटविकास अधिकारी यांनी केलेल्या चौकशीनुसार ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले होते, परंतु सदर ग्रामसेवकांना नंतर परत रुजू करून घेण्यात आले असता त्यांनी पुन्हा त्याचपध्दतीने साहित्य खरेदी करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता केली असल्याचे दिनांक ११ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत जळगाव (जि.वर्धा) येथील साहित्य खरेदी गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या निवेदनानुसार उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) मौजे जळगाव, ता.आर्वी, जि.वर्धा ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे.

सदर चौकशी अहवालानुसार ग्रामपंचायत, जळगांव, ता.आर्वी कडून खरेदी मध्ये अनियमितत्ता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे खरेदी प्रक्रीयेत झालेल्या अनियमिततेबाबत ग्रामपंचायत अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ग्रामीण भागातील घरकुल योजनेच्या अनुदानात वाढ करुन योजनेची व्याप्ती वाढविणेबाबत

**(११) * ३३३८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ओबीसीसाठी सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेतून सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात राज्यामध्ये ३ लाख घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सदर योजनेतंर्गत घरकुलांना निधी न दिल्याने अनेक लाभार्थी अनुदानाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यमंत्री महोदयांनी प्रत्येक विभागाला दिलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत राज्यात आवास योजनेंतर्गत १ लाख ६१ हजार घरकुल बांधण्याचे जिल्हानिहाय उद्दिष्ट दिले होते, त्यातील दीड लाख घरकुल बांधुन पूर्ण करण्यात आली परंतु अद्यापही त्यांना वाढीव ५० हजार रुपयांचे अनुदान मिळालेले नसल्याचे तसेच सातारा जिल्ह्यासह राज्यातील १५ जिल्हयांमध्ये उद्दिष्टांच्या ५० टक्के सुध्दा कामे पूर्ण झाली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत यावर्षी पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथे ५ हजार ७०० तसेच पी.एम.किसान जनधन, आदिम, रमाई आवास आणि शबरी घरकुल योजनेंतर्गत ७ हजारांहून अधिक घरकुले मंजूर झाली असून प्रत्यक्षात मात्र घरांचे बांधकाम सुरु केल्यानंतर लाभार्थ्यांना बांधकाम साहित्याचे वाढलेले भाव, जागेची अनुपलब्धता, तालुक्यात सर्वत्र पाणीटंचाई यासारख्या अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेची घोषणा २० नोव्हेंबर, २०१६ रोजी करण्यात आली असून सन २०१६ मधील बांधकाम साहित्य दर सूचीप्रमाणे घरकुलासाठी एक लाख वीस हजार रुपये अनुदान निश्चित करण्यात आले मात्र दरम्यानच्या दहा वर्षांच्या कालावधीत बांधकाम साहित्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने हे घरकुल उभारताना सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी येत असून प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलांसाठी ग्रामीण भागात किमान साडेतीन लाख रुपये व शहरी भागात पाच लाख रुपये करण्याची मागणी घरकुलधारक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे नाही.

(२) १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत राज्यात किमान १ लाख घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्याचे उदिष्ट होते व १,४८,५४२ (१४८.५%) घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आली. वाढीव रु. ५०,०००/- अनुदान हे सन २०२४-२५ पासून नवीन मंजूर घरकुलांना अनुज्ञेय आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) हे खरे आहे.

दिनांक २० मार्च,२०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ तसेच विविध राज्यपुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेंतर्गत, सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्श्यातून रुपये ५०,०००/- एवढी अतिरिक्त वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या रुपये ५०,०००/- रक्कमेमधून रुपये ३५,०००/- अनुदान हे घरकुल बांधकामासाठी तर, रुपये १५,०००/- इतके अनुदान हे प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर १ KW मर्यादेपर्यंत सौर ऊर्जा यंत्रणा उभारणी करीता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गतची कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१२) * ३५१८ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलजीवन मिशन योजनेतंर्गत नागपूर जिल्ह्यात सन २०२४ मध्ये जवळपास १२०० मंजूर कामांपैकी प्रत्यक्षात ७०० कामांना सुरुवात झाली असून त्यातील ५०० कामे अद्याप अपूर्ण असून नागपूर शहरामध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या तोतलाडोह मध्ये ५७.१०% जलसाठा असला तरी नागपूर ग्रामीण, रामटेक मतदार संघ व हिंगणा तालुक्यातील बहुतांश गावे दुष्काळग्रस्त असून येथे टँकरने पाणीपुरवठा होत असल्याने यावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नळपाणी योजनांना केंद्र सरकारच्या समभाग असलेल्या ४० कोटी रुपयांपैकी केवळ १० कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याने सदरहू योजनांची कामे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने रुपये ३७.४८ लाखांचा कृती आराखडा तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हिंगणा तालुक्यातील ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्याकरीता त्याचप्रमाणे सदर योजनांना निधी देऊन कामे पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत नागपूर जिल्ह्यात १३८२ योजना घेण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी १३७१ कामांना प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली. त्यापैकी ७१४ योजनांची कामे भौतीकदृष्टया पूर्ण झालेली असून पाणीपुरवठा सुरु आहे. ६५७ कामे प्रगतीपथावर आहेत. नागपूर जिल्ह्यात नागपूर तालुक्यातील ०३ गावांमध्ये एकूण ०३ टँकर, रामटेक मतदार संघातील पारशिवनी तालुक्यातील ०५ गावांमध्ये एकूण ०५ टँकर, रामटेक तालुक्यातील ०१ गावामध्ये एकूण ०१ टँकर तसेच हिंगणा तालुक्यातील १६ गावांमध्ये एकूण ०८ टँकर व्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

सन २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाचा हिस्सा अप्राप्त आहे. केंद्र शासनास राज्य शासनाकडुन निधी मिळण्याबाबत वेळोवेळी विनंती करण्यात आली आहे.

सदर योजनांच्या कामावर विपरित परिणाम होऊ नये म्हणुन सन २०२४-२०२५ मध्ये केंद्र शासनाचा हिस्सा प्राप्त होण्यापुर्वी राज्य शासनाकडुन रुपये ५४.७८ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाचा हिस्सा म्हणून रुपये २८.२० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सन २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाचा हिस्सा अप्राप्त आहे. तथापि, राज्य शासनाने रुपये २३.९१ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.
(३) अंशतः खरे आहे.

ग्रामीण भागातील पाणी टंचाई साठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने ५१.१२ कोटीचा कृती आराखडा तयार केलेला आहे.
(४) जल जीवन मिशन अंतर्गत हिंगणा तालुक्यात एकूण ११५ योजना घेण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ३८ योजनांची कामे पूर्ण झालेली आहे. ७७ योजनांची कामे प्रगतीपथावर आहे. तसेच पाणी टंचाई अंतर्गत नळ योजना विशेष दुरुस्तीचे २३ कामे घेण्यात आलेली आहे. सार्वजनिक विहीर खोलीकरण ०८ कामे घेण्यात आलेली आहे. हिंगणा तालुक्यातील १६ गावांमध्ये १३ विहीरी अधिग्रहित करण्यात आल्या असून एकूण ०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका तसेच कर्मचाऱ्यांच्या मासिक मानधन व इतर प्रलंबित मागण्यांबाबत

**(१३) * २५९१ श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी हा ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब वर्गासाठी महिला व बालकल्याणाचा मुख्य आधार असून राज्यात अंगणवाडी केंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविकांना मिळणारे मानधन हे अत्यंत तुटपुंजे व किमान वेतनापेक्षा कमी असल्याने त्यांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत असून राज्यातील दोन लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे मार्च, २०२५ या महिन्याचे मानधन अद्यापी त्यांच्या खात्यात जमा झाले नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील अंगणवाडी सेविकांनी मुंबईतील आझाद मैदानावर विविध प्रलंबित मागण्यांसाठी माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी अंगणवाडी कर्मचारी कृती समितीला दिलेल्या माहितीनुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन व ग्रॅज्युएटीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने निधीची तरतूद करून उक्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे तात्काळ मानधन देण्याबाबत तसेच पेन्शन व ग्रॅज्युएटीच्या उक्त प्रस्तावाला मान्यता देण्याकरीता व त्यांच्या विविध समस्या सोडवून किमान वेतन देण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा या केंद्र पुरस्कृत योजनेमधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधनाकरीता केंद्र हिस्सा, राज्य हिस्सा व अतिरिक्त राज्य हिश्यामधून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. नवीन आर्थिक वर्षाच्या सुरवातीला निधी उपलब्ध होण्यामध्ये काही अवधी लागत असतो. तथापि, निधी प्राप्त होताच मानधन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार, माहे मार्च २०२५ चे मानधन दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी व माहे एप्रिल महिन्याचे मानधन दिनांक ६ मे २०२५ रोजी अदा करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत मागील महिन्यापर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) एकात्मिक बालविकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून सदर योजनेतील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची पदे ही मानधनी तत्वावरील आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनाकरीता निधीची तरतूद करून मानधन नियमितपणे अदा करण्यात येत आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पेन्शन व ग्रॅज्युईटी देणे या प्रस्तावांबाबत कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कन्नड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेत अनियमितता होत असल्याबाबत

**(१४) * ३०२८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र ठरलेल्या ७ हजार ८८१ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर पैसे जमा करताना १५६ लाभार्थी हे दुसऱ्यांदा या योजनेचा लाभ घेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील ग्रामीण भागात ग्रामसेवक हे स्थळपाहणी न करता घरकुल योजनेसाठी आवश्यक नमुना नं. ८ देता येत असल्याने, या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यातील ५५१ लाभार्थ्यांना त्यांची स्वत:ची जागा नसल्याने त्यांनी घरकुल बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडे जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कन्नड तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पात्र ठरलेलया सर्व लाभार्थ्यांची कोणतीही चौकशी न करता सदर योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे देऊन शासनाची फसवणूक करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच घरकुलासाठी स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले नाही. सबब, कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

घर बांधण्यासाठी स्वतःची जागा उपलब्ध नसलेल्या ५५१ लाभार्थ्यांपैकी १४१ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली आहे. ७२ लाभार्थ्यांना गायरान जमीन वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत सुरु असून उर्वरित भूमीहीन लाभार्थ्यांना विविध योजनेंतर्गत जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील खडवली पसायदान विकास संस्थेतील बालकांवरील अत्याचार प्रकरणी संचालकावर कारवाई करण्याबाबत

**(१५) * ३११२ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील खडवली परिसरातील “ पसायदान विकास संस्था “ या अवैध वसतिगृहात २९ बालकांना मारहाण करण्यात आल्याची तसेच अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार वर्षांपासून या १२ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींना या आश्रमात पट्टे, रॉड, बांबूने मारहाण, रक्त निघेल इतके चिमटे काढण्यात येणे असे अनेक अत्याचार केले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालआश्रमातील मुलींनी अत्याचाराबाबत चाइल्ड हेल्पलाईनवर खडवली येथील पसायदान विकास संस्थेच्या संचालकाविरुध्द तक्रार दाखल करण्यात आली होती परंतु सदर तक्रारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले असून या आश्रमाचे संचालक यांनी आश्रम चालविण्याकरीता देणग्या घेतल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने उक्त वसतिगृहातील मुले व मुली यांना सुरक्षित ठिकाणी ठेवण्याकरीता तसेच सदर गुन्हयांतील दोषी संचालक व इतर कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे
(३) हे अंशत: खरे आहे,

दिनांक १०/०४/२०२५ रोजी चाईल्ड हेल्प लाईन नियंत्रण कक्ष महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे येथे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/०४/२०२५ रोजी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी ठाणे, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, ठाणे चाईल्ड हेल्प लाईन व सखी केंद्र उल्हासनगर यांनी खडवली (जि ठाणे) येथिल पसायदान विकास संस्थेस भेट दिली व ही संस्था अनधिकृत असल्याचे आढळून आल्यानंतर विभागाने याबाबत तात्काळ कार्यवाही करून संबंधितांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. सबब सदर तक्रारीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आले हे वस्तुस्थितीस धरुन नाही. तसेच संस्था संचालक यांनी देणग्या घेतल्याचे निदर्शनास आले किंवा कसे याबाबत संबंधित पोलीस विभागामार्फत तपासणी सुरु आहे.

(४) चौकशी करण्यात आली आहे

सदर चौकशीमध्ये यासंस्थेस महिला व बालविकास विभाग अथवा इतर कोणत्याही विभागाची नोंदणी प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले. तसेच पिडीत बालकांची स्थिती अतिशय गंभीर असल्याचे आढळून आले. सबब, बालकल्याण समितीच्या मान्यतेने सदर संस्थेतील काही बालकांना पालकांच्या ताब्यात देण्यात आले तर उर्वरीत बालकांना शासकीय बालगृहांमध्ये तसेच स्वयंसेवी संस्थांमध्ये दाखल करण्यात आले.

सदर गुन्हयातील दोषी संचालक व इतर कर्मचाऱ्यांवर भा.न्या.स. (बी.एन.एस) २०२३ मधील कलम ६४ (१), ६५ (२), ७४, ११८ (१), ३ (५), तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,६,८ व अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ मधील कलम ४२, ७५ व ८२ (१), अंतर्गत दिनांक ११/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना मा.न्यायालयासमोर हजर करुन त्यांची कारागृहामध्ये रवानगी करण्यात आली आहे. पोलीस विभागामार्फत पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील गिग कामगारांना सामाजिक सुरक्षा मिळण्यासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(१६) * २६१७ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वेगवेगळया क्षेत्रात असंघटित कामगारांच्या व्याख्येमध्ये बसणाऱ्या गिग कामगारांना सामाजिक व आर्थिक सुरक्षा मिळावी या उद्देशाने स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिलिव्हरी बॉय, रायडर, ड्रायव्हर व इतर असंघटित कामगारांचा या व्याख्येत समावेश केला जाणार आहे तसेच केंद्र सरकारच्या ई-श्रम पोर्टलवर या सर्व कामगारांना नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्वतंत्र महामंडळ प्रत्यक्षात कार्यान्वित केल्यानंतर या कामगारांना कोणते आर्थिक व सामाजिक लाभ देण्यात येणार आहेत काय तसेच सदरहू निर्णयाची प्रत्यक्ष प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१), (२) व (३) सर्वंकष धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रमुख शहरांमध्ये महिलांकरीता शासकीय वसतिगृहे उभारण्याबाबत

**(१७) * २७४१ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात कामासाठी येणाऱ्या महिलांना राहण्याकरीता हक्काची अशी पुरेशी शासकीय वसतिगृहे उपलब्ध नसल्याने या महिलांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून त्यांची सुरक्षितता धोक्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर आणि उपनगरात १० पेक्षा कमी वसतिगृहे असून या वसतिगृहात प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात प्रतिक्षा यादी असल्याने असंख्य महिलांना खाजगी पेंईंग गेस्ट सारखे पर्याय निवडावे लागत असून ते अत्यंत खर्चिक आणि असुरक्षित असल्यामुळे मुंबई व उपनगरांमध्ये तसेच पुणे, नागपूर सारख्या शहरांमध्ये शासकीय-निमशासकीय ठिकाणी काम करणाऱ्या महिलांकरीता वसतिगृह उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यभरातील मोठ्या शहरांमध्ये किमान ५०० महिला एका ठिकाणी राहु शकतील अशी किमान १० वसतिगृहे तसेच सर्व शहरांमध्ये किमान १ वसतिगृह उभारून पुरेशा मूलभूत सोयी-सुविधा व सुरक्षा देण्यासंदर्भात किंवा म्हाडा/सिडको सारख्या इमारतींमध्ये मुलींसाठी भाडे तत्वावर फ्लॅट उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२) व (३) नोकरी करणाऱ्या एकल महिला, अविवाहित, विधवा, घटस्फोटीत, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या महिलांना नोकरीच्या ठिकाणी सुरक्षित आणि सोयीस्कर पध्दतीने निवासाच्या व्यवस्थेकरीता "नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह" ही योजना राज्यात राबविण्यात येत असून एकूण ७४ वसतिगृह सुरु आहे.

केंद्र पुरस्कृत "मिशन शक्ती" या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार "सामर्थ्य" या उपयोजनेतील "सखी निवास" या योजनेंतर्गत ५० नवीन वसतिगृह सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच, केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५" अंतर्गत "भाग-१०-कार्यरत महिलांसाठी वसतिगृह बांधकाम" अंतर्गत राज्यातील ६ महानगरपालिका क्षेत्रात ७ वसतिगृह बांधकामाचा सुधारित प्रस्ताव नगरविकास विभागामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांना टूल किट न मिळाल्याबाबत

**(१८) * २३८५ श्री.सत्यजीत तांबे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेरोजगारांच्या हाताला काम उपलब्ध व्हावे व स्वतःचा व्यवसाय सुरू करता यावा यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येतात, त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेसाठी ९,०३० अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी ८,६५६ लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतंर्गत सलून व इतर अभ्यासक्रमांचे व्यावसायिकांसाठी प्रशिक्षण देण्यात आले मात्र त्यांना अद्याप सलून किट देण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील सलून व्यावसायिकांना प्रशिक्षण पूर्ण करूनही लाभार्थ्यांना सलून टूल किट वाटप करण्यात आले नसल्याने ते स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास असमर्थ असल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतंर्गत प्रशिक्षित लाभार्थ्यांना टूल किट मिळणेसाठी अनेक लाभार्थ्यांनी वारंवार जिल्हा प्रशासन व संबंधित विभागांकडे पाठपुरावा केला असूनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतंर्गत प्रशिक्षित लाभार्थ्यांना टूल किट व सलून टूल किट मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या कौशल्य विकास आणि उद्यमशिलता मंत्रालयाअंतर्गत असणाऱ्या राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाकडून प्रशिक्षण दिले जाते आणि सुक्ष्म, लघु, मध्यम आणि उद्योग मंत्रालयाकडून लाभार्थ्यांना टूलकिटचे थेट वाटप केले जाते. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत ९,९८१ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ८,४७० लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. त्यापैकी ८७० लाभार्थ्यांना टूलकिट वाटप करण्यात आले आहेत. तथापि, सुक्ष्म, लघु, मध्यम आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्राप्त महितीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील एकाही सलुन व्यवसायीकांना अद्याप टूलकिट वाटप करण्यात आलेले नाही, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून केद्र शासनाकडे नियमित पाठपुरावा करण्यात येतो.

(४) वरील प्रमाणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोंडगाव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील अंगणवाडीमध्ये स्तनदा व गरोदर माता यांना देण्यात येणाऱ्या पोषक आहाराच्या पाकिटात मृत उंदीर सापडल्याबाबत

**(१९) * ३१७८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडीच्या माध्यमातून प्रत्येक महिन्याला स्तनदा व गरोदर माता यांना पोषक खाद्याचा पुरवठा करण्यात येत असून मौजे कोंडगाव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अंगणवाडीमध्ये स्तनदा व गरोदर माता यांना देण्यात येणाऱ्या पोषक खाद्याच्या पॅकिंगमध्ये मेलेला उंदीर आढळून आला असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोंडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित जबाबदार एजन्सीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने या प्रकरणाची चौकशी करून त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता तसेच ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील कुपोषित बालकांना घरपोच आहार पुरविण्यात येतो. बालविकास प्रकल्प, संगमेश्वर येथील बीट साखरपा अंतर्गत असलेल्या कोंडगाव मुरलीधर आळी अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी घरपोच आहार वितरित करण्यात आला. या आहार वितरणापूर्वी अंगणवाडी मदतनीस यांना गरोदर महिला व स्तनदा मातांना पुरवण्यात येणारे एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स पाकिट हाताळताना सदर पाकिटात संशयास्पद वस्तू असल्याचा संशय आला. त्यानंतर अंगणवाडी मदतनीस यांनी ते पाकीट फोडून पाहिले असता, त्यामध्ये एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स या आहाराव्यतिरिक्त एक बाह्य घटक असल्याचे निदर्शनास आले. आहार वाटपापूर्वीच ही बाब समजल्यामुळे लाभार्थ्यांना आहार वाटप करण्यात आलेला नव्हता.

(२) कोंडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच यांचेमार्फत जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी तथा आयुक्तालय एकात्मिक बालविकास सेवा योजना यांना सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी केलेल्या चौकशीनुसार, संबंधित आहाराचा नमुना तपासणीसाठी NABL लॅबमध्ये पाठवण्यात आला होता.तसेच खबरदारीचा उपाय म्हणून एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स या बॅचमधील सर्व माल बदलून घेण्यात आला आहे. तसेच याबाबत संबंधित पुरवठाधारक यांना नोटीस पाठविण्यात आली आहे. प्रयोगशाळेच्या तपासणीनंतर प्राप्त झालेल्या अहवालानुसार, तपासणीसाठी दिलेल्या घरपोच आहारामध्ये केंद्र शासनाच्या निकषांनुसार आवश्यक असलेले उष्मांक (कॅलरीज) आणि प्रथिने (प्रोटीन्स) असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच, सदर आहार अन्न सुरक्षा आणि मानक (Food and Safety Standards) नुसार योग्य असल्याचे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेची कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२०) * २४१९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नागरिकांना घरोघरी नळाने पाणी मिळावे या उद्देशाने पालघर जिल्ह्यात जवळपास २५० कोटींहून अधिक रकमेच्या योजनांची मंजूर केलेली कामे प्रलंबित असल्याने मोखाडा तालुक्यात टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात जवळपास या योजनांपैकी ७ योजना बंद असून या योजनांना मागील आठ महिन्यांपासून कामांसाठी निधी मिळत नसल्याने सदर योजना प्रलंबित असल्याने याबाबत ठेकेदारांनीही तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या योजनाही संपूर्ण जिल्ह्यात अपूर्णावस्थेत असून मोखाडा, जव्हार, विक्रमगड या आदिवासी तालुक्यांतील महिलांना पाण्याकरीता डोंगर दऱ्यातून दोन-तीन कि.मी.चा प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन सदर योजनांना तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत पालघर जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण ३३९ गावांकरीता रुपये ११७१.२५ कोटीच्या २६ योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांवर आतापर्यंत रुपये ७२१.१७ कोटी इतका खर्च झालेला आहे. या योजनांपैकी एका योजनेचे काम पूर्ण झाले आहे, उर्वरीत २५ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी मोखाडा तालुका ५८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा आणि अर्नाळा व १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा या दोन योजना अशंतः कार्यान्वित झालेल्या आहेत. मोखाडा तालुका ५८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची प्रगतीपथावरील कामे सन २०२५ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

माहे जानेवारी ते जून या कालावधीमध्ये मोखाडा तालुक्यात ४ गावे व ३३ पाड्यांकरीता टँकरने पाणीपुरवठा सुरु होता.परंतु पूरेसा पाऊस झाल्यामुळे दिनांक १९/०६/२०२५ पासून टँकरने पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

(२) मोखाडा तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ०१ योजनेचे काम सुरू आहे. निधी अभावि कोणत्याही योजनेचे काम प्रलंबित नाही.

जिल्हा परिषदेमार्फत मोखाडा तालुक्यातील ५६ गावांकरीता ५५ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे राबविण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत एकूण २८ कामे पूर्ण झालेली असून, त्याव्दारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. उर्वरीत २८ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) पालघर जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत एकूण ६१३ गावांकरीता ५६३ योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांपैकी १८३ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झालेली असून, उर्वरीत ३७९ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर आहेत. तसेच या योजनांमधील उपांगाची कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही चालू आहे.

माहे जानेवारी ते मे या कालावधीमध्ये पालघर जिल्ह्यात जव्हार, मोखाडा व विक्रमगड तालुक्यात पाणी टंचाई भासत असलेली एकूण १० गावे व ७९ पाड्यांकरीता ३० टँकरने दररोज पाणीपुरवठा केला जात होता. परंतु पूरेसा पाऊस झाल्यामुळे दिनांक १९/०६/२०२५ पासून टँकरने पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे या तालुक्यातील महिलांना पाण्याकरीता डोंगर दऱ्यातून दोन तीन कि.मी चा प्रवास करावा लागतो अशी बाब नाही.

(४) सन २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाचा हिस्सा अप्राप्त आहे. केंद्र शासनास राज्य शासनाकडुन निधी मिळण्याबाबत वेळोवेळी विनंती करण्यात आली आहे.

सदर योजनांच्या कामावर विपरित परिणाम होऊ नये म्हणुन सन २०२४-२०२५ मध्ये केंद्र शासनाचा हिस्सा प्राप्त होण्यापुर्वी राज्य शासनाकडुन रुपये १०४.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाचा हिस्सा म्हणून रुपये ५५.७३ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सन २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाचा हिस्सा अप्राप्त आहे. तथापि, राज्य शासनाने रुपये २३.९९ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील नवीन आरोग्य संस्था व उपकेंद्रे कार्यान्वित करण्याबाबत

**(२१)** * **२३२५ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील धामणगाव, चिचोंडी बु. (ता.येवला) आणि खेडलेझुंगे (ता.निफाड) या ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यासाठी आरोग्य सेवा आयुक्तालयाने दिनांक ५ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास तसेच, नाशिक जिल्ह्यातील उंदीरवाडी, अंगुलगाव, शिरसगाव लौकी आणि कुसमाडी या ठिकाणी नवीन उपकेंद्रे निर्माण करण्यासाठी दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान शासनाला प्रस्ताव पाठविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला व निफाड येथे नवीन आरोग्य संस्थांची नितांत आवश्यकता असल्यामुळे सदर आरोग्य केंद्रे तातडीने मंजूर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ व दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील नवीन आरोग्य संस्था व उपकेंद्रे निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) धामणगाव, चिंचोडी (ता.येवला जि.नाशिक) व खेडलेझुंगे ता.निफाड जि.नाशिक या ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच नाशिक जिल्ह्यातील उंदीरवाडी, अंगुलगाव, शिरसगाव लौकी, आणि कुसमाडी या ठिकाणी नवीन उपकेंद्र स्थापन करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर PIP सन २०२४-२५ व २०२५-२६ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात सदर बांधकामे मंजूर झालेली आहेत.
(४) निरंक

-----------------

**राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी आरोग्य योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत**

**(२२) * २९७४ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेची व्याप्ती वाढविण्याकरीता शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने एक आराखडा तयार केला असून त्यानुसार ३५ जिल्हयांमध्ये अंगीकृत न झालेल्या खाजगी रुग्णालयांच्या संख्येपैकी १० टक्के रुग्णालये आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे नोंदणीकृत आरोग्य संस्थांपैकी शासकीय रुग्णालये (१), शासकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालये (१३) व खासगी वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित रुग्णालये (१०७) अशा एकूण २ हजार ३७५ रुग्णालयांचा नव्याने समावेश करण्याचे उद्दिष्ट निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने रुग्णालयांची संख्या वाढविली असली तरी त्यामध्ये उपचार खर्चाचे पॅकेजेस, रुग्णांवर व्यवस्थित उपचार होण्यासाठी तसेच काही गंभीर आजारासाठी पॅकेजेस उपलब्ध नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी शासनाकडे दिनांक १२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत रुग्णालयांना देण्यात येणाऱ्या उपचार खर्चाची पॅकेजेस वाढविण्यासंदर्भात कोणताही निर्णय न घेतल्याने मूळच्याच संलग्न रुग्णालयीन प्रशासनानुसार ही पॅकेजेस रुग्णालयांना परवडणारी नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरेआहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेंतर्गत रुग्णांवर योग्य उपचार व्हावेत त्यादृष्टीने काही महत्वाच्या गंभीर आजारांसाठी पॅकेजेस उपलब्ध होण्याबाबत तसेच या योजनेचा जिल्हानिहाय आढावा घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करावयाच्या जमिनीच्या नुकसान भरपाईबाबत

**(२३) * २२७७ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीच्या अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रासाठी चिंध्रण, कानपोली, व म्हाळुंगे या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमीन संपादनाच्या मोबदल्यात देण्यात येणारी नुकसान भरपाईबाबत अजूनही स्पष्टता नसल्याने व संपादित होणाऱ्या जमिनीवरील घरे, झाडे, विहिरी, तलाव, बोअरवेल यांची वेगळी नुकसान भरपाई मिळणार की नाही याबाबत मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिंध्रण, कानपोली, व म्हाळुंगे या गावातील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी संपादित करीत असताना, त्यांच्या समस्या व मागण्या विचारात घेऊन बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अति. तळोजा औद्योगिक क्षेत्रासाठी प्रकरण-६ ची अधिसूचना दिनांक २६/०८/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर क्षेत्राची संयुक्त मोजणी करणेत येऊन कलम ३२ (१) च्या अधिसूचनेनूसार एकूण खाजगी २५८.४७६५ हे.आर क्षेत्र इतके निश्चि:त करण्यात आले आहे. संबंधितांना सदर क्षेत्राचा मोबदला वाटप सुरू असून त्यापैकी १९५.८० हे.आर इतके क्षेत्र मऔवि महामंडळाच्या ताब्यात आले आहे.

(२) दिनांक १३/०७/२०२० रोजी झालेल्या १२५ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये प्रति हेक्टरी ४.५० कोटी दर निश्चित करण्यात आला असून त्याप्रमाणे खातेदारांकडून संमतीपत्रे प्राप्त झाल्यानंतर सदरच्या दराने नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, रायगड यांनी परिगणित केलेल्या व म.औ.वि. महामंडळामार्फत शिफारस केलेल्या LAAR Act २०१३ मधील तरतुदीनुसार परिगणित होणारा भूसंपादनाच्या प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा जास्त प्रति हेक्टरी रुपये ४.५० कोटी रुपये दरास उच्चाधिकार समितीने मंजुरी दिली आहे. प्रस्तूत दर हा सर्वसमावेशक असल्याचे स्पष्ट केलेले आहे.

(३) अति. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील चिंध्रण, कानपोली व महाळुंगी या गावातील शेतकऱ्यांच्या प्रकल्पग्रस्त भुखंडांसंदर्भात व इतर समस्या व मागण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही मऔवि महामंडळाच्या स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्धापूर तालुक्यातील (जि.नांदेड) ग्रामीण भागातील जलजीवन मिशन योजनेच्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) * २८७३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर तालुक्यातील (जि.नांदेड) ग्रामीण भागातील जनतेला घर तिथे नळ देऊन शुध्द पिण्याचे पाणी मिळावे याकरीता प्रत्येक ग्रामपंचायत निहाय जलजीवन मिशन योजनेंतर्गत शासनाने कोट्यवधी रुपयाचा निधी मंजूर केला असून सदर निधीतून ठेकेदारांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून जलजीवन मिशनची कामे अपूर्णावस्थेत ठेवून कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून शासनाच्या निधीचा अपहार केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जलजीवन मिशन योजनेंतर्गची कामे अपूर्णावस्थेत ठेवून कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून शासनाच्या निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषींवर तसेच अपूर्णावस्थेतील कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेच्या एकूण ४१ योजना मंजूर असून त्यापैकी ३० योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण झालेली आहेत व ९ योजनांची कामे प्रगतीपथावर असली तरी सदर योजना कार्यान्वित करुन एकूण ३९ योजनांद्वारे गावांना पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. तसेच अर्धापूर तालुक्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत २ योजना राबविण्यात येत असून त्यापैकी मालेगाव पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्यात आले असून पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. तसेच १८३ गावे ग्रीड पाणीपुरवठा योजनेचे काम भौतिकदृष्टया ६६.४८ टक्के पूर्ण झालेले असून योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर योजना डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना कार्यमुक्त करताना नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(२५) * २९३३ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८ / प्रक्र३८९/नवि- २० दिनांक १६/०२/२०२१ मधील मुद्दा क्र. १० नुसार "एकाच जिल्ह्यातील नागरी किंवा ग्रामीण संस्थेमध्ये सेवा वर्ग करता येणार नाही" असे स्पष्ट नमुद असताना जिल्हा परिषद नाशिक प्राथमिक शिक्षण विभागाने जिल्हा परिषदेतील कार्यरत शिक्षकांना कार्यमुक्त करून नाशिक महानगरपालिकेत हजर होण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेतील शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त असताना २५ शिक्षकांना महानगरपालिकेत रुजू होण्यासाठी कार्यमुक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित जिल्हा परिषद शिक्षकांना कार्यमुक्त करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८९/नवि-२०, दिनांक १६/०२/२०२१ हा ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेला नसून, नगरविकास विभागाने निर्गमित केला आहे.

सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी जिल्हा परिषद, नाशिक येथील शिक्षकांच्या सेवा नाशिक महानगरपालिकेत वर्ग करण्याबाबत जिल्हा परिषद, नाशिक यांना विनंती केली. या विनंतीनुसार ग्रामविकास विभागाच्या दिनांक २९/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नाशिक जिल्हा परिषदेतील २३ शिक्षकांना "ना-हरकत प्रमाणपत्र" देऊन नाशिक महानगरपालिकेत हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात आले.

(३) नगरविकास विभागाच्या उक्त नमुद शासन निर्णयातील अ.क्र.१० येथील तरतुदीनुसार, विषयाधीन प्रस्ताव तपासण्याची जबाबदारी संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका नाशिक यांची होती. तथापि, त्यांनी प्रचलित शासन धोरणातील तरतुदींचे पालन आणि शहानिशा न करता संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त करण्यासंदर्भात नाशिक महानगरपालिकेकडून जिल्हा परिषद, नाशिक यांना विनंती केली असल्याचे निदर्शनास आले. यास्तव, संबंधित प्रशासन अधिकारी, नाशिक महानगरपालिका यांना शालेय शिक्षण विभागाच्या आदेशान्वये दिनांक ७/०५/२०२५ पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे भुतीवली (ता.कर्जत, जि.रायगड) येथील पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीतील दुषित पाण्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(२६) * ३५८७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भुतीवली (ता.कर्जत,जि.रायगड) येथील नळपाणी योजनेच्या विहिरीला छिद्र पडल्याने सभोवतालच्या नाल्याचे दूषित पाणी विहिरीत जाऊन सहा आदिवासी ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मौजे आसल ग्रामपंचायतीचे माजी सरपंच यांनी कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून उक्त नळपाणी योजनेंतर्गत विहिरीचे व नाल्याचे बांधकाम करून सहा आदिवासी वाड्यांना शुध्द पाणीपुरवठा सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

एप्रिल महिन्यामध्ये विहीरीतील पाण्याची पातळी कमी झाल्याने अज्ञात व्यक्तीकडून जुनी दगडी बांधकाम असलेल्या विहीरीला अधिक पाणी विहीरीत येण्यासाठी छिद्र पाडले होते.

उक्त प्रकरणी मौजे आसल ग्रामपंचायतीचे माजी सरपंच यांनी कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे सदर बाब तोंडी स्वरुपात निदर्शनास आणली आहे. सदरची योजना ग्रामपंचायतीकडून हस्तांतरीत झाली असून, ग्रामपंचायतीकडून छिद्र बंद केले आहे. त्यामुळे सहा आदिवासी वाड्यांच्या ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे, अशी बाब नाही.

(२) सदर विहीरीचे छिद्र ग्रामपंचायतीकडून व्यवस्थित बंद करुन घेतले आहे, त्यामुळे आता नाल्यातील बाहेरील पाणी विहीरीत जात नाही. सहा आदिवासी वाड्यांना जलशुध्दीकरण यंत्रादवारे शुध्द व सुरळीत पाणीपुरवठा केला जात आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## धामणगाव (जि.बुलढाणा) आणि बोदवड व जामनेर (जि.जळगाव) येथे ग्रामीण रुग्णालय उभारण्याबाबत

**(२७) * ४३७४ श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणगाव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथे तसेच बोदवड व जामनेर (जि.जळगाव) या तालुक्यांच्या परिसरात एकूण ५२ गावे असून या बहुतांश गावांमध्ये आरोग्याच्या प्राथमिक सुविधा उपलब्ध नसून गंभीर आजारांमध्ये उपचारासाठी लोकांना ४० कि.मी. दूर असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयाअभावी सदर गावातील व परिसरातील वृध्द, महिला, लहान मुले तसेच अपघातग्रस्त रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळण्यास विलंब होत असून उपचाराअभावी मृत्यूचे प्रमाणही वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धामणगाव (ता.बुलढाणा) तसेच बोदवड व जामनेर (जि.जळगाव) या तालुक्यात ग्रामीण रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) तालुका मोताळा (जि.बुलढाणा) येथे ६, तालुका बोदवड (जि.जळगाव) येथे २ व तालुका जामनेर (जि.जळगाव) येथे ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. तालुका मोताळा (जि.बुलढाणा) येथे १, तालुका बोदवड (जि.जळगाव) येथे १ व तालुका जामनेर (जि.जळगाव) येथे १ ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे. त्यामुळे निकषाप्रमाणे तीनही आरोग्य सुविधा तालुक्यात उपलब्ध करण्यात आलेली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) बोदवड तालुक्यात ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व जामनेर तालुक्यात ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, धामणगाव, ता.मोताळा, जि.बुलढाणा चे ३० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतच्या संदर्भात नमूद करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतला आहे की, आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत. तथापि, चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यक त्या ठिकाणी नवीन बांधकामे करण्यात येतील. दरम्यानच्या कालावधीत ज्या ठिकाणी नवीन आरोग्य संस्थांची निर्मिती करणे आवश्यक आहे त्यासंबंधातील माहिती घेऊन आराखडा तयार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महापे, नवी मुंबई (जि.ठाणे) औद्योगिक वसाहतीतील अधिकाऱ्याने पदाचा गैरवापर करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(२८) * ४४०३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापे, नवी मुंबई (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील कार्यालयात कार्यरत असलेल्या नगररचनाकार यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून अनेक ठिकाणी आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या नावे तसेच इतर नातेवाईकांच्या नावे बेनामी संपत्ती जमा केली असल्याची तसेच सदरहू कर्मचारी गेली १२ वर्षे MMR रिजनमधील महापेसारख्या औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असून शासकीय सेवेत रुजू झाल्यापासून एकाच ठिकाणी ते प्रदीर्घ काळ कार्यरत असल्याची बाब दिनांक ५ जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारामती येथील एका प्लॉटच्या संदर्भात चौकशी समिती कडून त्यांना दोषी ठरविण्यात आले असून त्यांची वेतन रोखण्याची कारवाई देखील प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि पदाचा दुरुपयोग करून बेनामी संपत्ती जमा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) सदर उपरचनाकार या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याचे संदर्भात बेनामी संपत्ती जमा केली असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर अधिकारी हे म.औ.वि. महामंडळात दिनांक २९/०६/२००० रोजी सहाय्यक रचनाकार या पदावर रुजू झालेले असून आतापर्यंत त्यांची सेवा सहाय्यक रचनाकार व उपरचनाकार या पदावर मुख्यालय अंधेरी, प्रादेशिक कार्यालय महापे, प्रादेशिक कार्यालय पनवेल व प्रादेशिक कार्यालय ठाणे-१ येथे झालेली आहे.

(२) व (३) बारामती औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्र.पी-४० या भुखंडावरिल नकाशे मंजुरी व अतिरिक्त FSI मंजूर करण्यामध्ये झालेल्या अनियमितता प्रकरणी म.औ.वि. महामंडळाकडून विभागीय चौकशी करण्यात आली असून, चौकशीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. सदर चौकशीअंती अंशत: दोषी आढळलेल्या एकूण ४ अधिकारी यांना कार्यालयीन आदेश क्र.२१७ व २१८ दिनांक ३०/०४/२०२४ अन्वएये एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी प्रभावाने रोखुन ठेवण्यानची शिक्षा आदेशित करण्यावत आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील अधिकारी व कंत्राटदारांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याबाबत

**(२९) * २३६२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेतंर्गत असलेल्या बांधकाम विभागातील अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने धामोरी ते टेंभापुरी, राज्यमार्ग ३९ ते सिरसगाव, मांडवा ते पांढरओव्हळ व महालक्ष्मीखेडा ते तळपिंप्री ह्या चार रस्त्यांची कामे पूर्ण केल्याचे कागदोपत्री दाखवून जवळपास २ कोटी रुपयांची देयके काढून आर्थिक गैरव्यवहार केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करुन कारवाई करण्याबाबत कार्यवाही सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (लेखाशीर्ष ३०५४-२४१९) अंतर्गत प्रश्नांकित मंजूर असलेल्या कामांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| कामाचे नाव | प्रशासकीय मंजूरीचे आर्थिक वर्ष | मंजूर रक्कम (रुपये लक्ष) | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| धामोरी ते टेंभापूरी रस्ता (ग्रामा-१९३) | २०२३-२४ | ५०.०० | काम सुरु नाही. |
| मांडवा ते पांढरओहळ रस्ता (ग्रामा-११३) | २०२३-२४ | ५०.०० | काम सुरु तथापि, अपूर्ण. |
| महालक्ष्मी खेडा ते तळपिंप्री रस्ता (ग्रामा-१८१) | २०२४-२५ | ६०.०० | काम सुरु नाही. |
| रा.मा.३९ ते सिरजगांव रस्ता (ग्रामा-८५) | २०२४-२५ | ६०.०० | काम सुरु तथापि, अपूर्ण. |

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असतानाही सदर कामे पूर्ण झाल्याचे मुल्यांकन नोंदवून जिल्हा परिषद स्तरावरुन देयके शासनास सादर करण्यात आली होती. तथापि, सदर देयके LPRS (Liability Payment Register System) प्रणालीवर शासन स्तरावरुन त्रृटी काढून परत करण्यात आली आहेत.

प्रस्तुत प्रकरणी प्रथमदर्शनी जबाबदार असलेले कनिष्ठ अभियंता यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे. संबंधित उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत आहे.

तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभाग व वित्त विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून, त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदेमार्फत उचित कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मंजूर निधीच्या तिप्पट बोगस खर्च दाखवून गैरव्यवहार केल्याबाबत

**(३०) * २७०० डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानाच्या कामांसाठी शासनाने प्रत्यक्षात केवळ ६.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असतानाही २४ कोटी रुपयांचा बोगस खर्च दाखविण्यात आल्याने शासनाच्या निधीचा गैरवापर केला असून प्रत्यक्षात ७३ गावांमध्ये जलसंधारणाची विविध कामे सुरु असणाऱ्या कामांचा दर्जा निकृष्ट असल्याने व शासनाने दिलेल्या निधीच्या तुलनेत तिपटीहून अधिक खर्च झाला असून मृद व जलसंधारण विभाग, लघु सिंचन विभाग, कृषी विभाग, पाटबंधारे विभाग, वनीकरण विभाग या सर्वच विभागांकडून या कामांसाठी निधी वापरण्यात आला असून सदर निधी प्रत्यक्षात कुठे खर्च केला याबाबतचा तपशील नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ६.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असतानाही २४ कोटी रुपयांचा बोगस खर्च दाखवून शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) १. जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत हिंगोली जिल्ह्यास सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये विशेष निधीतून रुपये १५.३७७२ कोटी इतका निधी शासनाने उपलब्ध करून दिला आहे.

२. हिंगोली जिल्ह्यातील ७३ गावांमध्ये मृद व जलसंधारण विभाग, लघु सिंचन विभाग (जि.प.), कृषी विभाग, जलसंपदा विभाग, वन विभाग (सामाजिक वनीकरण), भूजल सर्वेक्षण विभाग या विभागांमार्फत सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये विशेष निधीतून मंजूर ६२२ कामांवर रुपये १५.३७७२ कोटी आणि विविध योजनांच्या अभिसरणातून मंजूर ४०१ कामांवर रुपये ८.६०८१ कोटी असा एकूण रुपये २३.९८५३ कोटी इतका खर्च करण्यात करण्यात आलेला आहे. तसेच, चालू आर्थिक वर्षी २४५ कामे प्रगतीपथावर आहेत.

३. जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत निवड करण्यात आलेल्या ७३ गावांमध्ये सदर खर्च झालेला असून पूर्ण झालेल्या १०२३ कामांची त्रयस्थ संस्थेमार्फत गुणवत्ता तपासणी करण्यात आलेली आहे.

४. जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत निवड करण्यात आलेल्या ७३ गावांमध्ये रुपये २३.९८५३ कोटी इतका खर्च झालेला असल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यांतील गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गतच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३१) * ३४३० श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील एकूण १४२ गावांमध्ये जलजीवन मिशनच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये गैरव्यवहार झाला असून सदर कामामध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याकरीता मुख्य अभियंता, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करून कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी मा.मंत्री, पाणीपुरवठा विभाग यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) आर्वी, आष्टी व कारंजा या तालुक्यातील एकूण १४२ गावांमध्ये जल जीवन मिशनची कामे मंजूर आहेत. मा.लोकप्रतिनिधींनी सन २०२४ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र.९८७ च्या अनुषंगाने सदर गावांतील जल जीवन मिशनच्या कामांची तपासणी करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे दिनांक १५/०७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली ०५ सदस्यीय समिती स्थापित केली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी वर्धा जिल्ह्यातील आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांच्या कामांची तपासणी करण्याकरीता स्थापित समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करणेबाबत

**(३२) * ३५२० श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांबाडा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथे बोगस डॉक्टर कोणतीही पदवी नसताना खाजगी दवाखाने चालवत असून, या बोगस डॉक्टरांच्या उपचारामुळे येथील ११ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेत बोगस डॉक्टर तसेच फार्मसी संचालकाचा सहभाग असून आरोग्य विभागाकडे तक्रार करूनही दोषींवर तात्काळ कारवाई न झाल्याने रुग्णाच्या नातेवाईकांसह स्थानिक नागरिकांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सध्या कार्यरत असलेल्या बोगस डॉक्टरांची अंदाजित संख्या किती असून, या बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ अंतर्गत गेल्या दोन वर्षात किती गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी किती जणांना शिक्षा झाली आहे,

(४) असल्यास, राज्यातील बोगस डॉक्टरांचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कठोर उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) अंशत: खरे आहे. खांबाळा येथील ११ वर्षीय मुलीचा मृत्यू दिनांक ३१/०७/२०२४ रोजी झाल्याची घटना निदर्शनास आलेली आहे. तथापि, मृत्यू चुकीच्या उपचारामुळे झाला याबाबतची खातरजमा झालेली नाही. वैध परवाना नसताना वैद्यकीय व्यवसाय केल्याने संबंधित बोगस डॉक्टरावर दिनांक २४/०९/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे.
(३) शासनाकडे उपलब्ध माहितीनुसार मागील दोन वर्षाच्या सन २०२३ व सन २०२४ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार १७८ इतक्या बोगस डॉक्टरांवर कार्यवाही करण्यात आलेली असून १६५ इतक्यांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्यापैकी १२१ मा.न्यायालयात प्रलंबित आहेत व उर्वरीत पोलीसांकडे तपासणीकरता आहेत.
(४) बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर कार्यवाही करण्याकरीता जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय तसेच नगर पालिका व महानगरपालिका स्तरावर अनुक्रमे जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी व मनपा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५/०९/१९९१ रोजीच्या शासन निर्णयान्वये शोध समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच, बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरीता दिनांक ०७/०२/२००० रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात आलेली आहे. बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरूध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम ३३, ३३(अ) व ३८ नुसार कारवाई करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना दिनांक १९/०८/२००० रोजीच्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. विभागाच्या सदर उपाय योजनेस अनुसरून बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा आढावा घेऊन संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची कारवाई पोलीस यंत्रणेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. सदर कार्यवाहीत बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे कलम ३३, ३६ व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४१९ व ४२० अंतर्गत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करून मा.न्यायालयामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील गर्भवती ऊसतोड महिला मजुरांच्या सुदृढ आरोग्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३३) * ४४१६ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात सुमारे ७८,४७६ ऊसतोड महिला मजुर असून त्यापैकी ८४३ ऊसतोड महिला मजूरांनी ऊसतोडणीला जाण्यापूर्वी गर्भपिशवी काढली असल्याचे निदर्शनास आले असून यामध्ये ३० ते ३५ वयोगटातील महिलांचा अधिक समावेश असल्याची तसेच जवळपास ९५२३ महिला गर्भवती असतानाही त्या ऊस तोडणीचे काम करीत असल्याची बाब आरोग्य विभागाच्या अहवालातून दिनांक २ जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास बीड जिल्ह्यातील गर्भवती ऊसतोड महिला मजूरांच्या सुदृढ आरोग्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

बीड जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियेसंदर्भात तपासणी करण्यासाठी डॉ(श्रीमती) निलम गो-हे, वि.प.स यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६ जून, २०१९ अन्वये राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीच्या दीर्घकालीन व अल्पकालीन उपाययोजनेबाबतच्या शिफारशीनुसार बीड जिल्ह्यामध्ये गर्भाशय शस्त्रक्रीया करण्यासाठी जिल्हा शल्य चिकीत्सकांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ मध्ये झालेल्या महिला मजूरांच्या आरोग्य सर्वेक्षण अहवालानुसार बीड जिल्ह्यात सुमारे ७८,४७६ ऊसतोड महिला मजुर असून, त्यातील ऊसतोडीस जाणाऱ्या कामगार महिलांपैकी सन २०१९ पूर्वी ५७६ व सन २०१९ नंतर २६७ अशा एकूण ८४३ महिलांच्या गर्भाशय शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

सदर ऊसतोड महिला मजूरांच्या सुदृढ आरोग्यासाठी खालीलप्रमाणे उपायोजना करण्यात येत आहे.

• उसतोड कामगारांची माहिती संकलित करुन त्यांची आरोग्य तपासणी व उपाययोजना करण्याकरीता जिल्हा/तालुका तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात आले असून सदर अधिकाऱ्यांमार्फत ऊसतोड कामगारांच्या आरोग्य तपासणीचे संनियत्रण करुन सर्व वरिष्ठ/राज्य कार्यालयाशी समन्वय ठेवण्यात येतो.

• सर्व ऊस तोड कामगारांची कुटुंबासह हंगामासाठी जाण्यापूर्वी (सप्टेंबर/ऑक्टोबर) व आल्यानंतर (एप्रिल/मे) वर्षातून किमान दोन वेळा आरोग्य तपासणी करण्यात येते. त्याची माहिती (पूर्व इतिहास, निदान, हिमोग्लोबिन पातळी व औषध उपचार इ.) वाटप केलेल्या हेल्थ कार्डवर नोंदवली जाते.

• कार्यक्षेत्रातील सर्व ऊसतोड कामगारांच्या टोळींना हंगामासाठी जाताना व येताना वाटेत येणाऱ्या सर्व आरोग्य संस्थांचे मॅपिंग करुन त्याची माहिती व संपर्क क्र. (१०२/१०८ इ.) व इतर आरोग्य विषयक टोल फ्री क्रमांक त्यांच्या प्रमुखास /मुकादमास कळविण्यात येतात.

• प्रसूतीपूर्व सर्व स्थलांतरीत गरोदर मातांची आर.सी.एच. पोर्टल मध्ये नोंदणी करुन आवश्यक त्या सर्व तपासण्यासह मातृत्व अनुदानाबद्दल उपलब्ध असलेल्या योजनांचा लाभ पात्र महिलांना देण्यात येतो.

• १०० टक्के संख्यात्मक प्रसूती होण्याकरीता गरोदरमातांची आशा कार्यकर्ती व आरोग्य सेविका मार्फत भेटी देऊन पाठपुरावा करुन जननी शिशु सुरक्षा अंतर्गत मोफत सेवा (उदा. आहार, वाहतूक सेवा, औषधी प्रयोगशाळा चाचण्या इत्यादी) दिल्या जातात.

• प्रसूती पश्चात किमान चार आरोग्य तपासणी गृह भेटी देऊन माता व बालकांची काळजी घेवून आवश्यकतेनुसार उपचार दिले जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मिरज (जि.सांगली) येथील शासकीय रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेबाबत

**(३४) * २७४७ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) सिव्हिल हॉस्पिटलमध्ये प्रसूतीसाठी दाखल झालेल्या कविता आलदर या महिलेच्या तीन दिवसाच्या अर्भकाला दिनांक ३ मे २०२५ रोजी वा त्यासुमारास अज्ञात महिलेने अपहरण केल्याचे तसेच नाशिक येथे ही माहे जानेवारी, २०२५ मध्ये तसेच राज्यात इतरही शासकीय रुग्णालयात रुग्णालय प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अशा प्रकारच्या घटना घडल्याने महिलांच्या प्रसूती व नवजात बालकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याची बाब माहे, एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरज येथील अर्भक अपहरणासंदर्भात समर्थन संस्थेने दिनांक २८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य, मा.मंत्री. महिला व बालविकास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा संचालनालय तसेच जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासकीय रूग्णालयामधील सुरक्षा यंत्रणा, सीसीटीव्ही निरीक्षण, रुग्ण व नातेवाईकांच्या हालचालींची नोंद ठेवण्याबाबतच्या व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याकरीता कोणती कार्यवाही केली व याप्रकरणी दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२), व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथून अर्भक अपहरणाची घटना घडली असता ही बाब निदर्शनास आल्यानंतर तातडीने महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन मिरज यांना पाचारण करण्यात आले. पोलीस प्रशासनाने अपहरण झालेले अर्भक ३ दिवसामध्ये रुग्ण सौ. कविता आलदर यांच्याकडे सुखरुप सुपूर्त केले आहे.

तसेच, जिल्हा रुग्णालय नाशिक येथील प्रसुती कक्षातुन नवजात शिशुचे अपहरण झाल्याची तक्रार केल्यानंतर पोलीसांनी तपास करुन नवजात बालक व अपहरणकर्ती महीला यांना शोधून काढले आहे. राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालय व रुग्णालयामधून बालकांचे अपहरण/चोरी यांना प्रतिबंध करण्यासाठी कार्यप्रणाली (SOP) तयार करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड व नागपूर जिल्ह्यांमध्ये अल्पवयीन मुली गर्भवती होण्याच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(३५) * ४२४८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात बालविवाहामुळे माहे एप्रिल, २०२४ ते माहे मार्च, २०२५ या कालावधीत १२ मुलींची गर्भवती म्हणून नोंद झाली असून यामध्ये बीड ४, गेवराई २, वडवणी २ आणि आष्टी, केज, धारुर, शिरुर कासार येथील प्रत्येकी एका मुलींचा समावेश असून अल्पवयीन मुलींना गर्भधारणा होण्याचे प्रमाणातही जिल्ह्यात लक्षणीय वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी केलेल्या एका अभ्यासातून नागपूर शहर व जिल्ह्यात अविवाहित मुली-महिलांमध्ये गर्भवती होण्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे व १२४ प्रकरणांपैकी ६७ प्रकरणे अल्पवयीन मुलींची असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अल्पवयीन मातांच्या प्रसुतीनंतर अशा मुलांमध्ये कुपोषणाची समस्या तसेच माता व बालमृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असल्याने अविवाहित मुली-महिलांचे समुपदेशन करुन अल्पवयीन मुलींची गर्भधारणा व मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना नियमितपणे पूरक पोषण आहार देण्यात येतो. तसेच अतितीव्र कुपोषित (SAM) बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्याकरीता EDNF- Energy Dense Nutritious Food हा अतिरिक्त आहार देण्यात येतो.

अल्पवयीन मातांच्या प्रसुतीनंतर त्यांच्या मुलांमध्ये कुपोषणाची समस्या निर्माण होवू नये यासाठी मातांना आरोग्य सेविका व आशा यांच्या मार्फत समुपदेशन करण्यात येते.

नवजात शिशुंची काळजी (HBNC) व लहान मुलांची घरपोच काळजी कार्यक्रम (HBYC) अंतर्गत आशा सेविका मार्फत बालकांचा पाठपुरावा केला जातो.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत फिरते आरोग्य पथक, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केन्द्रामार्फत बालकांची आरोग्य तपासणी केली जाते.

किशोरवयीन मुले व मुलींना शाळेमध्ये लैंगिक शिक्षण दिले जाते.

शाळा, महाविद्यालये व सामुदायिक स्तरावर किशोरवयात होणारा मासिक धर्माचा त्रास, अल्पवयीन असताना गर्भवती होण्याचे दुष्परिणाम याबाबत आशा, समुपदेशक व आरोग्य कर्मचारी मार्फत समुपदेशन तसेच मार्गदर्शन केले जाते.

अल्पवयीन व अविवाहित मुली व महिलांमध्ये गर्भधारणा झाल्यास आरोग्य विभाग व महिला व बालविकास विभाग, पोलीस विभाग व एन.जी.ओ यांचेशी समन्वय साधुन, DCPU व चाइल्ड लाईन यांच्या माध्यमातून पीडित बालिका व कुटुंबाचे समुपदेशन केले जाते व विलंब न करता गरोदरपणात तातडीने आरोग्य सेवा पुरविण्यात येऊन योग्य ती काळजी घेतली जाते. तसेच त्यांच्या मुलांचे पुर्नवसन केले जाते. याबाबत DCPU मार्फत बाल संरक्षण समित्या यांना प्रशिक्षण देऊन याबाबत जनजागृती केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कर्मचारी राज्य विमा महामंडळामार्फत कार्यरत रुग्णालयांना अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) * ३७५८ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कर्मचारी राज्यविमा महामंडळामार्फत चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांच्या इमारती, वैद्यकीय उपकरणे यांची दूरवस्था झाली असून, या रुग्णालयात डॉक्टर,परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांचा अभाव असून सदर रुग्णालयात कामगार व त्यांच्या कुंटुंबियांना योग्य पध्दतीने उपचार मिळत नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाकरीता कामगार व उद्योजक यांच्यामार्फत शासनाला दरवर्षी ७०० कोटी रुपये दिले जात असून, उक्त रुग्णांलयामध्ये योग्य सुविधा न मिळाल्यास, शासनास देण्यात येणारे कामगार योगदान बंद करण्याबाबत निर्णय कामगार संघटना कृती समितीने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ईएसआयमार्फत चालविण्यात येत असलेल्या रुग्णालयांच्या इमारती व वैद्यकीय उपकरणे अद्ययावत करण्यासाठी तसेच येथील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामपंचायतींकरीता घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) * २२८५ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतीमध्ये एकाही ग्रामपंचायतीच्या मालकीचे स्वतःचे ‘डम्पिंग ग्राउंड’ नसल्याने घनकचरा व्यवस्थापनाची मोठी समस्या निर्माण झाली असून, पनवेल मधील वाढणारी लोकसंख्या पाहता पनवेल तालुक्यासाठी ‘स्वतंत्र डम्पिंग ग्राऊंड’ निर्माण करण्याची मागणी जनतेतून होत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ७१ ग्रामपंचायतींकडे घनकचरा टाकण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याने सुका व ओला घनकचरा हा सरसकट रस्त्यांच्या बाजूला तसेच नदीपात्रात टाकण्याचे प्रमाण वाढत असल्याने प्रदूषणाची खूप मोठी समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल तालुक्यातील ७१ गावांचा घनकचरा व्यवस्थापनचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे अंशतः खरे आहे. सद्य:स्थितीत पनवेल तालुक्यात स्वतःचे मालकीचे डम्पिंग ग्राउंड असणाऱ्या तीन ग्रामपंचायती आहेत. उर्वरित ग्रामपंचायतीसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा मागणीची प्रक्रिया सुरु आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे. वाढते नागरीकरण, व शहरीकरण यामुळे काही अंशी प्रमाणात घनकचरा समस्या निर्माण होत आहे. परंतु स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत ग्रामीण भागात कचरा व्यवस्थापनासाठी कंपोष्ट पिट, सार्वजनिक कंपोष्ट पिट, प्लास्टिक संकलन केंद्र यांची सुविधा निर्माण करण्यात येत आहे.
(३) पनवेल तालुक्यात ७१ ग्राम पंचायती असून १४५ गावे आहेत. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत पनवेल तालुक्यातील सर्व गावांचे घनकचरा व्यवस्थापनाचे DPR तयार करण्यात आले असून सर्व गावांच्या कामास कार्यारंभ आदेश देऊन कामे पूर्ण करण्यात येत आहेत. पनवेल तालुक्यातील वाढत्या नागरिकीकरणामुळे घनकचरा व्यवस्थापनाकरीता पंचायत समिती मार्फत सिडको व नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीचे कचरा व्यवस्थापन करणेबाबत सिडको या नियोजन प्राधिकरणाकडे पंचायत समिती, पनवेल कार्यालयाकडील दिनांक १० मार्च २०२५ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## वाळुज (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे पाणी पुरवठ्यासाठी अतिरिक्त पाईपलाईनच्या कामास मंजुरी देण्याबाबत

**(३८) * २४३४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळुज महानगर ग्रामपंचायतीची (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) लोकसंख्या जवळपास एक लक्ष असल्याने औद्योगिक विकास महामंडळाकडून १४ लक्ष लीटर पिण्याचे पाणी मंजूर असून, १४ लक्ष लीटर पाणी साठविण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ३ पाण्याच्या टाक्या असून या टाक्यांच्या कार्यरत पाईपलाईन मधून फक्त ७ लक्ष लीटर पाणीपुरवठा होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या कार्यरत असलेल्या पाईप लाईनची क्षमता कमी असल्याने औद्योगिक विकास महामंडळाकडून मंजूर असलेल्या पाण्याची उचल होत नसल्यामुळे येथील नागरी वसाहतीत टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून स्थानिक ग्रामपंचायतीसाठी ते फारच खर्चीक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित ७ लक्ष लीटर पाणी उचल करण्यासाठी २.५ कि.मी.ची ८ इंची पाईपलाईन टाकणे आवश्यक असून जेणेकरुन नागरिकांना नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळू शकेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाळुज महानगर ग्रामपंचायतीकरीता ७ लक्ष लीटर पाणी उचल करण्यासाठी २.५ कि.मी.ची ८ इंची पाईपलाईनचे काम करणेकरीता मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मौजे वाळूज बुद्रुक व खुर्द येथील लोकसंख्या सन २०११ नुसार १९५३१ इतकी आहे. या गावांकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १४ लक्ष लीटर प्रति दिन पाणी साठा मंजूर असून माहे मे २०२५ च्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी देयकानुसार ४६१८६ क्यु.मीटर पाणी उचल केल्याचे दिसते. त्यानुसार प्रती दिवशी १५.४० लक्ष पाणी ग्रामपंचायत वापरत आहे.

ग्रामपंचायत व लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार पाण्याची निकड लक्षात घेवून मौजे वाळुज खुर्द व बुद्रुक येथे सद्य:स्थितीत २४००० लि. क्षमतेच्या प्रत्येकी २ टॅकरच्या दोन फेऱ्या सुरु असून टँकरद्वारे पाणी पुरवठ्याचा खर्च हा शासनामार्फत करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) जल जीवन मिशन अंतर्गत ३७३ गावे गंगापूर- वैजापुर ग्रीड पाणीपुरवठा योजनेमध्ये वाळुज बु. गावाचा समावेश करण्यात आला असून सदर गावासाठी ११.९३ लक्ष लीटर क्षमतेचा जलकुंभ वाळुज ग्रामपंचायतीकडील योजनेमधून प्रस्तावित असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील ग्रीड योजनेमध्ये २५० मीमी व्यासाच्या डी.आय. के-७ लांबी ७६८ मी. ब्राँच पाईप लाईनद्वारे जोडणी करुन पाणीपुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * २३३३ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे विठुमाऊलींच्या वारीला पालखी सोहळयात येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासह पालखी मार्गावरील रस्ते, पालखीतळ यांची दुरुस्तीचे कामे जलदगतीने करण्याचा निर्णय मा.मंत्री, ग्रामविकास यांनी घेतला असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या अडचणीवर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून' निधी उपलब्ध करण्याकरीता मा.मंत्री, ग्रामविकास महोदयांनी दोन महिन्यात प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय, असल्यास त्यानुसार निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या सर्व कामांची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.

ग्रामविकास विभागामार्फत आषाढी एकादशी-२०२५ च्या निमित्ताने पालखी मार्गावरील जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी लेखाशीर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये १६ रस्ते कामांना डांबरीकरण/खडीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील खालील पालखी मार्गावरील रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात आलेली असून सदर मार्ग सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

१. पंढरपूर ते पिराची कुरोली माळखांबी पालखी मार्ग भाग-१ सा.क्र.०/००० ते २०/५००, ता.पंढरपूर

२. पंढरपूर ते पिराची कुरोली माळखांबी पालखी मार्ग भाग-२ सा.क्र.२०/५०० ते २८/८००, ता.माळशिरस

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.